पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. २० दिनांक १९/०२/२०२५

पालघर पोलीस दलाकडुन महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच महिला दक्षता समिती यांच्याकरीता सायबर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

सध्याच्या डिजीटल युगात प्रत्येक व्यक्ती मोबाईल फोन, इंटरनेटचा वापर करत आहे. सायबर गुन्हेगार नागरीकांना वेगवेगळे आमिष दाखवणारे फोन कॉल करत असतात. काही नागरीक सायबर गुन्हेगारांच्या जाळयात अडकत आहेत. त्यामुळे सायबर गुन्हयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. पालघर जिल्हयातील नागरीक सायबर गुन्हंयाना बळी पडु नये तसेच त्यांचेमध्ये सायबर साक्षरता निर्माण करण्यासाठी मा. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या संकल्पनेतुन जनसंवाद अभियान अंतर्गत 'सायबर सुरक्षीत पालघर' ही मोहिम राबविण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांचे ७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत सध्या पालघर जिल्ह्यात सायबर पोलीस ठाणे पालघर यांचेकडून "सायबर सुरक्षित पालघर" ही मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिम सर्व नागरिकांपर्यंत पोहोचने व जनजागृती होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आज दिनांक १८/०२/२०२५ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सायबर सुरक्षित पालघर मोहिमेअंतर्गत सायबर योद्धयांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी सोनोपंत दांडेकर कॉलेज, पालघर, चाफेकर कॉलेज, पालघर, आय.डि.एल. कॉलेज, पालघर, सी. एस. पी. कॉलेज, आशागड, थीम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बोईसर, सेंट जॉन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पालघर या महाविद्यालयातील एकूण ४०० विद्यार्थी तसेच महिला दक्षता समितीच्या एकूण ३३ महिला उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रमात सायबर योद्धा यांना सायबर गुन्हयांची ओळख, सायबर गुन्हे होण्याची पद्धती, सायबर गुन्हे घडल्यानंतर (गोल्डन अवर) पहिल्या एक तासात करावयाची कामगिरी, नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवर तक्रारी कशी नोंदवावी, मोबाईल हरविल्यानंतर सी.ई.आय.आर. पोर्टलवर तक्रार कशी नोंदवावी, याबाबत माहीती देवुन, सायबर सुरक्षित पालघर ही व्हिडीओची क्लीप दाखविण्यात आली तसेच सायबर गुन्हे घडल्यानंतर जनतेला कशी मदत करण्यात यावी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्रीमती संगिता शिंदे अल्फांन्सो, पोलीस उपअधीक्षक (गृह), पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली परि. पोलीस उपअधीक्षक, श्रीमती भागीरथी पवार, पोलीस निरीक्षक श्री अजय गोरड प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे, पोलीस उप निरीक्षक, रुपाली गुंड, सायबर पोलीस ठाणे, मपोना/कविता पाटील, मपोशि मोनिका तिडके, पोअं/रामदास दुर्गेष्ट, पोअं/अक्षय शेट्ये, पोअं/रुपेश पाटील, पोअं/रोहित तोरस्कर सर्व नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर व इतर अंमलदार यांनी यशस्विरित्या पार पाडला.